Series ψYZXW

Set-4

प्रश्न-पत्र कोड
Q.P. Code **8**

रोल नं.
Roll No. [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ]

परीक्षार्थींनी उत्तर-पुस्तिकेच्या मुख-पृष्ठावर कोड नं. अवश्य लिहावा.
Candidates must write the Q.P. Code on the title page of the answer-book.

# मराठी
# MARATHI

*वेळ : **3** तास* — *गुण : **80***

*निर्धारित समय : **3** घंटे* — *अधिकतम अंक : **80***

*Time allowed : **3** hours* — *Maximum Marks : **80***

- प्रश्न-पत्रिकेत **15** छापील पाने आहेत; कृपया तपासून घ्या.
- प्रश्न-पत्रिकेच्या उजवीकडे छापलेला कोड नंबर उत्तर-पुस्तिकेच्या मुख-पृष्ठावर लिहा.
- प्रश्न-पत्रिकेत **22** प्रश्न आहेत; तपासून घ्या.
- **उत्तरे लिहताना प्रश्न क्रमांक अवश्य लिहा.**
- प्रश्न-पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटे देण्यात आली आहेत. प्रश्न-पत्रिका 10.15 वाजता वाटण्यात येईल. 10.15 ते 10.30 या दरम्यान प्रश्न-पत्रिका फक्त वाचायची आहे; उत्तरे लिहायला सुरुवात करु नये.

- Please check that this question paper contains **15** printed pages.
- Q.P. Code given on the right hand side of the question paper should be written on the title page of the answer-book by the candidate.
- Please check that this question paper contains **22** questions.
- **Please write down the Serial Number of the question in the answer-book before attempting it.**
- 15 minute time has been allotted to read this question paper. The question paper will be distributed at 10.15 a.m. From 10.15 a.m. to 10.30 a.m., the candidates will read the question paper only and will not write any answer on the answer-book during this period.

*General Instructions :*

*(i)* *Question paper is divided into* ***Two*** *sections.*

*(ii)* *It has total 22 questions.*

*(iii)* ***Section A** : 12 Question No. **1** to **12***

*(iv)* ***Section B** : 10 Question No. **13** to **22***

*(v)* *Attempt questions as per specific instructions.*

*(vi)* *Write questions no. in answer book before attempting it.*

## SECTION-A

1. खालील उतारा वाचून प्रश्नांच्या उत्तराचा योग्य पर्याय निवडा. (कोणतेही **पाच**) **5 × 1 = 5**

एकविसाव्या शतकात सामान्य मानवाचे जीवनमान थोडे सुधारले आहे. आपल्या वाडवडिलांपेक्षा अनेक नवीन उपभोग्याच्या गोष्टी त्याला लाभल्या आहेत. त्याच्या गरजा वाढल्या आहेत आणि या वाढलेल्या गरजा भागविण्यासाठी त्याला घाण्याच्या बैलाप्रमाणे स्वतःला कामाला जुंपून घ्यावे लागत आहे. बाबांबरोबर घरातील आईही नोकरीसाठी बाहेर पडली आणि घरातील चिमण्यांचं बालपण हरवून गेलं.

आजवर या बालपणाचे गायिलेले गोडवे ऐकत आलो 'रम्यते बालपण' असे कविलेखकांनी त्याला गौरविले. 'लहानपण देगा देवा' अशी आळवणी तुकारामांसारख्या संत पुरूषानी केली. पण आजच्या बालपणात ही रम्यता राहिली आहे का ? जगात डोकावल्यापासूनच त्या बालकाकडून नाना अपेक्षा पालकांनी बाळगलेल्या असतात. 'प्ले क्लास' 'किंडर गार्डन' इत्यादी गोंडस नावाखाली त्याला शाळेच्या वर्गातून कोंबले जाते. त्याच्या मुक्ततेला पहिला अडसर तेथे बसतो. बरं तेथे त्याला मार्गदर्शन करण्यासाठी जमलेल्या 'ताईबाई' या तरी त्या छोट्यांचे मन जाणणाऱ्या असतात का ? कारण आता अशा वर्गातूनही अभ्यासक्रम, त्याचे नियोजन, निरीक्षण या गोष्टी बोकाळत आहेत. स्वाभाविकच तेथेही अनेक गोष्टी धाकटपटश्यातून केल्या जातात. मग अशा वातावरणात बालपणातील रम्यत्व कोठे उरणार ?

आज सुखवस्तू घरांतून लहान मुलांचे वाढदिवस मोठ्या प्रमाणात साजरे होतात. त्यांच्यासाठी खेळणी आणली जातात, मेजवाण्या आयोजित केल्या जातात. पण अशा किती प्रसंगांत त्यांचे मन, मत लक्षात घेतले जाते ? पुष्कळशा गोष्टी ह्या त्यांच्यावर लादल्या जातात. कित्येकदा हे वाढदिवस पालकांच्या प्रतिष्ठेचे प्रदर्शन ठरते.

(I) सामान्य माणसाची तुलना कोणाबरोबर केली आहे ?

(अ) वाडवडिल (ब) घाण्याचा बैल

(क) बालपणाशी (ड) प्राण्यांशी

(II) कवी, लेखकांनी कोणाचे गोडवे गाइले आहेत ?

(अ) संतांचे (ब) बालपणाचे

(क) मुलांचे (ड) फुलांचे

(III) लेखकाने कोणत्या संताचा उल्लेख केला आहे ?

(अ) संत एकनाथ (ब) संत मुक्ताबाई

(क) संत तुकाराम (ड) रामदास

(IV) प्लेक्लास, किंडर गार्डन इत्यादी शाळा म्हणजे –

(अ) बालपणातील आनंद (ब) मुलांच्या स्वातंत्र्यातील अडसर

(क) मुलांवर संस्कार करण्याची जागा (ड) ज्ञाननिर्मितीच्या जागा

(V) लहान मुलांसाठीच्या वर्गामध्ये –

(अ) खूप आनंद असतो. (ब) छोट्याच्या मनाचा विचार केला जातो.

(क) अनेक गोष्टी धाकटपटश्यातून केल्या जातात. (ड) चंगल असते

(VI) लहान मुलांचे वाढदिवस मोठ्या प्रमाणावर कोण साजरेकरतात ?

(अ) गरीब आईवडील (ब) सुखवस्तू घरातील आईवडील

(क) राजकीय नेते (ड) सामान्य लोक

(VII) लहान मुलांचे वाढदिवस म्हणजे फक्त काय असते ?

(अ) मुलांच्या मनाचा विचार (ब) पालकांच्या प्रतिष्ठेचे प्रदर्शन

(क) मुलांना खेळणी देण्याचा दिवस (ड) गोडधोड खाण्याचा दिवस

2. खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा. (कोणतेही **पाच**) **5 × 1 = 5**

'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती' उक्तीप्रमाणे या जगातील समाजातील सर्वच लोकांचा उद्धार व्हावयाचा असेल तर संतांना, समाज सुधारकांना जन्म घ्यावा लागतो. त्यांना आपले आयुष्य जगाच्या कल्याणासाठी खर्च करावे लागते. महात्मा फुले हे त्यातलेच एक थोर विचारवंत आणि समाजसुधारक होत. वाहत्या प्रवाहाबरोबर लाकूड, ओंडके, पालापाचोळा आणि मृत जनावरे वाहत असतात. पण प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने मासे पोहत असतात. याच सिद्धांतावर आधारित फुल्यांचे जीवन आहे. तत्कालीन परिस्थिती अनुकूल नसतांनाही नव्या कल्पना समाजासमोर मांडल्या आणि त्या समाजाला स्वीकारायला भाग पाडले.

अठराव्या शतकाच्या पूर्वाधात म्हणजे 1827 साली पुण्यात जन्मलेल्या फुल्यांनी जातिव्यवस्था व वर्णव्यवस्थेवर कडकडून हल्ला केला. जोपर्यंत समाजातील जातिव्यवस्था आणि वर्णव्यवस्थेचा बीमोड होत नाही तोपर्यंत समताधिष्ठित समाज व्यवस्थेची निर्मिती होणे अशक्य आहे असा विचार त्योनी परखडपणे मांडला. अशी भूमिका मांडणारे ते पहिले भारतीय होते.

त्याकाळी समाज अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट प्रथा, केशवपन यासारख्या भयानक विकृतीने समाज ग्रासला होता. स्त्रियांना दुय्यम स्थान होते. त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेतल्यामुळे गुलामगिरीचे जीवन जगावे लागत असे. फुल्यांनी तत्कालीन समाजाचे अवलोकन केले आणि स्त्रीच्या आणि अस्पृश्यांच्या उद्धारासाठी आयुष्य वेचण्याचे ठरविले. वयाच्या अवघ्या 21 व्या वर्षी म्हणजे सन् 1847 साली मुलींच्यासाठी पुण्यात पहिली शाळा काढली. महात्मा फुल्यांनी स्वतःच्या पत्नीला म्हणजे सावित्रीबाई फुल्यांना साक्षर करुन मुलींच्याशाळेवर शिक्षिका म्हणून नेमणूक केली. त्यांच्या या कार्यप्रेरणेतून सावित्रीबाई फुले भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका ठरल्या.

(I) संत, समाजसुधारकांचा जन्म कशासाठी असतो ?

(अ) धर्मप्रसार (ब) जगाचे कल्याण

(क) स्वतःचा उद्धार (ड) उपदेश करण्यास

(II) महात्मा फुल्यांच्या जीवनाची तुलना कोणाबरोबर केली आहे ?

(अ) लाकूड (ब) पालापाचोळा

(क) जिवंत मासे (ड) विन्दतजत

(III) जाति व वर्णव्यस्थेबाबत महात्मा फुल्यांची भूमिका कोणती होती ?

(अ) अनुकूल (ब) प्रतिकूल

(क) तटस्थ (ड) सहाय्यक

(IV) महात्मा फुल्यांना समाजामध्ये कोणती गोष्ट हवी होती ?

(अ) जातिव्यवस्था (ब) वर्णव्यवस्था

(क) समता (ड) विषमता

(V) त्याकाळी समाज कशाने ग्रासला होता ?

(अ) दरिद्रयाने (ब) भयानक विकृतीने

(क) रोगराईने (ड) सुखासमाधानाने

(VI) मुलींसाठी पुण्यात पहिली शाळा कोणी काढली ?

(अ) लोकमान्य टिलक (ब) महात्मा फुले

(क) गो.ग. आगरकर (ड) रानडे

(VII) भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका कोण होत्या ?

(अ) सावित्रीबाई फुले (ब) आनंदीबाई जोशी

(क) लक्ष्मीबाई टिळक (ड) पंडिता रमाबाई

3. सूचनेनुसार लिहा.

सूचनेनुसार योग्य पर्याय निवडा. (कोणतेही **चार**) **4 × 1 = 4**

(I) विजयाने मला मदत केली. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

(अ) सर्वनाम (ब) विशेषण

(क) नाम (ड) अलंकार

(II) बाप रे ! किती पाऊस पडतोय हा ! (केवलप्रयोगी अव्यय ओळखा)

(अ) किती (ब) बाप रे

(क) पाऊस (ड) पडतोय

(III) विठोबाचे हात कमरेवर आहेत. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

(अ) क्रियाविशेषण अव्यय (ब) विशेषण

(क) शब्दयोगी अव्यय (ड) सर्वनाम

(IV) सविताने काल रात्री खूप अभ्यास केला. (क्रियाविशेषण अव्यय ओळखा)

(अ) काल (ब) खूप

(क) अभ्यास (ड) रात्री

(V) रिना आली आणि तिने गाणे म्हटले. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

(अ) विशेषण (ब) उभयान्वयी अव्यय

(क) क्रियाविशेषण अव्यय (ड) अलंकार

4. सूचनेनुसार योग्य पर्याय निवडा. (कोणतेही **तीन**) **3 × 1 = 3**

(I) गोविंदाने आज सुटी घेतली आहे. (काळ ओळखा)

(अ) वर्तमानकाळ (ब) भूतकाळ

(क) भविष्यकाळ (ड) साधा भविष्यकाळ

(II) सीमा काम पूर्ण करेल. (काळ ओळखा)

(अ) भूतकाळ (ब) वर्तमानकाळ

(क) भविष्यकाळ (ड) साधा वर्तमानकाळ

(III) खालीलपैकी कोणते वाक्य भूतकाळातील आहे.

(अ) संत समाजसुधारक होते. (ब) संत समाजसुधारक आहेत.

(क) संत समाजसुधारक असतील. (ड) संत समाजसुधारक होणार.

(IV) नागरिक गाव स्वच्छ ठेवतात. (यावाक्याचे भविष्यकाळातील वाक्य निवडा)

(अ) नागरिक गाव स्वच्छ ठेवत आहे. (ब) नागरिक गाव स्वच्छ ठेवत होते

(क) नागरिक गाव स्वच्छ ठेवतील (ड) नागरिक गाव स्वच्छ ठेवतात

5. सूचनेनुसार योग्य पर्याय निवडा. (कोणतेही **तीन**) $3 \times 1 = 3$

(I) किती छान आहात तुम्ही सगळे जण ! (वाक्याचा प्रकार ओळखा)

(अ) प्रश्नार्थक (ब) उद्‌गारवाचक

(क) आज्ञार्थी (ड) विधानार्थी

(II) हाघाटाचा रस्ता खूप अवघड आहे. (योग्य नकारार्थी शब्द निवडा)

(अ) हा घाटाचा रस्ता खूप सोपा आहे (ब) हा घाटाचा रस्ता खूप अवघड नाही

(क) हा घाटाचा रस्ता खूप सोपा नाही (ड) हा घाटाचा रस्ता खूप अवघड असणार

(III) आई मी खेळायला जाऊका ? (वाक्याचा प्रकार ओळखा)

(अ) उद्‌गारवाचक (ब) आज्ञार्थी

(क) प्रश्नार्थी (ड) विधानार्थी

(IV) बाप रे ! खूपच मोठे आहे रे शहर ! (या वाक्याचे विधानार्थी वाक्य कोणते)

(अ) हे शहर अतिशय मोठे आहे. (ब) हे शहर खूपच मोठे आहेकाय ?

(क) ओ हो ! किती मोठे आहे हे शहर (ड) किती रे ! मोठे शहर

6. समानार्थी शब्दांसाठी योग्य पर्याय निवडा. (कोणतेही **दोन**) $2 \times 1 = 2$

(I) चरण

(अ) कर (ब) पाय

(क) हात (ड) बाहू

(II) देव

(अ) सुर (ब) असुर

(क) सूर (ड) दानव

(III) धवल

(अ) स्वच्छ (ब) शुभ्र

(क) पांढरा (ड) पीत

7. विरुद्धार्थी शब्दांसाठी योग्य पर्याय निवडा. (कोणतेही **दोन**) **2 × 1 = 2**

(I) आकर्षक

(अ) आवडलेले (ब) अनाकर्षक

(क) वाईट (ड) गढूळ

(II) चांगला

(अ) ठीक (ब) बरा

(क) वाईट (ड) उत्तम

(III) सुशिक्षित

(अ) अर्धशिक्षित (ब) निरक्षर

(क) अशिक्षित (ड) प्रशिक्षित

8. खलील शब्दांचे लिंग बदल करा व उत्तरांसाठी योग्य पर्याय निवडा. (कोणतेही **दोन**) **2 × 1 = 2**

(I) सेवक

(अ) नोकराणी (ब) सेविका

(क) कामवाली (ड) सेवकी

(II) सम्राट

(अ) राणी (ब) सम्राटीण

(क) सम्राज्ञी (ड) भूप

(III) उंट

(अ) सांडणी (ब) उंटीण

(क) उंटी (ड) उंटा

9. खालील शब्दांचे वचन बदल करा व उत्तरसाठी योग्य पर्याय निवडा. (कोणतेही **दोन**) **2 × 1 = 2**

(I) माळ

(अ) माळी (ब) माळा

(क) माळे (ड) माळ्या

(II) घागर

(अ) घागरी (ब) घागऱ्या

(क) घागरे (ड) घागरा

(III) गंमत

(अ) गंमत्या (ब) गंमती

(क) गंमाती (ड) गंमता

10. खालील सामासिक शब्दांचा समास ओळखा व उत्तरासाठी योग्य पर्याय निवडा. (कोणतेही **दोन**) **2 × 1 = 2**

(I) प्रतिक्षण

(अ) समाहार द्वंद्व (ब) द्विगू

(क) अव्ययीभाव (ड) तत्पुरुष

(II) रामलक्ष्मण

(अ) द्विगू (ब) इतरेत्तर द्वंद्व

(क) अव्ययीभाव (ड) तत्पुरुष

(III) चौकोन

(अ) द्विगू (ब) अव्ययीभाव

(क) वैकल्पिक द्वंद्व (ड) तत्पुरुष

11. खालील उतारा वाचून त्यावर आधारित प्रश्नांच्या उत्तराचा अचूक पर्याय निवडा. (कोणतेही **पाच**) $5 \times 1 = 5$

दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात निरंजनाची स्तुती फोटोसकट छापून आली होती. भीषण अपघात टाळल्याचं श्रेय त्यालाच देण्यात आलं होतं. त्या दिवशी मावशीच्या घराकडे मोठमोठी माणसं आली. खुद्द जिल्हाधिकारी आले. शाळेचे मुख्याध्यापक आणि भडसावळे गुरुजीही आले. निरंजनने धावत पुढे होऊन गुरुजींचे पाय धरले. रडत रडत तो म्हणाला," गुरुजी, मी नापास होणार. माझा कालचा नागरिकशास्त्राचा पेपर बुडाला."

"नाही रे बाळा. तू उत्तम नागरिक आहेस. शेकडो माणसांचा जीव वाचवलास आणि नागरिकशास्त्राच्या ख-याखु-या परिक्षेत पास झालास. तुझं वर्ष कसं वाया जाईल ? हे बघ, शाळेचे सगळे अधिकारी आलेत. खास बाब म्हणून तुझी नागरिकशास्त्राची परीक्षा उद्या घेतली जाणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी तुला सरकारी वसतिगृहात प्रवेश दयायचं ठरवलंय आणि वर वह्या पुस्तकांच्या खर्चासाठी शिष्यवृत्ती मिळणार आहे. आता नको हं तुला वार लावून जेवायला ।" असं म्हणून गुरुजींनी निरंजनला हृदयांशी धरलं, तेव्हा साऱ्यांचेच डोळे पाणावले.

(I) निरंजन कोठे रहात होता ?

(अ) शाळेच्या वसतिगृहात (ब) गुरुजींच्या घरी

(क) मावशीच्या घरी (ड) काकांच्या घरी

(II) निरंजनला कशाचे श्रेय देण्यात आले होते ?

(अ) परिक्षेत पास झाल्याचे (ब) भीषण अपघात टाळल्याचे

(क) खूप अभ्यास केल्याचे (ड) परिश्रम केल्याचे

(III) निरंजनला कोणत्या गोष्टीचे खूप दुःख झाले होते ?

(अ) नापास होण्याचे (ब) अपघात झाल्याचे

(क) नागरिक शास्त्राचा पेपर बुडाल्याचे (ड) परीक्षेत झोप आल्याचे

(IV) निरंजनला उत्तम नागरिक कोण म्हणाले ?

(अ) जिल्हाधिकारी (ब) मुख्याध्यापक

(क) भडसावळे गुरुजी (ड) शिक्षिका

(V) निरंजनला जिल्हाधिकाऱ्यांनी कोठे प्रवेश द्यायचे ठरविले ?

(अ) मोठ्या शाळेमध्ये (ब) सरकारी वसतिगृहामध्ये

(क) गावातील वसतिगृहामध्ये (ड) महाविद्यालयात

(VI) 'पाय धरणे' या वाक्प्रचाराचा अर्थ –

(अ) नमस्कार करणे (ब) क्षमा मागणे

(क) सेवा करणे (ड) अजीजी करणे

12. खालील कविता वाचून आधारित प्रश्नांच्या उत्तराचा अचूक पर्याय निवडा. (कोणतेही **पाच**) **5 × 1 = 5**

फुलामुलांतून हसतो श्रावण
मातीचे हो मंगल तनमन
चैतन्याचे फिरे सुदर्शन
शेतामधुनी पिकवू मोती, धन हे अपरंपार ।।
या हातांनी यंत्र डोलते
श्रमशक्तीचे मंत्र बोलते
उद्योगाचे चक्र चालते
आभाळावर उत्क्रांतीचा घुमवू या ललकार ।।

(I) फुलामुलांतून कोण हसते ?

(अ) परमेश्वर (ब) निसर्ग

(क) श्रावण (ड) माती

(II) कोणते सुदर्शन फिरते ?

(अ) श्रीकृष्णाचे (ब) चैतन्याचे

(क) उद्योगाचे (ड) नागेचे

(III) शेतामधून आम्ही काय पिकविणार आहोत ?

(अ) मोती (ब) धान्य

(क) कापूस (ड) ऊस

(IV) यंत्र कोण चालविते ?

(अ) बीज (ब) जनित्र

(क) हात (ड) माणूस

(V) आपल्याला कोणत्या मंत्राची गरज आहे ?

(अ) वेदातील (ब) श्रमशक्तीचे

(क) देवतांचे (ड) स्तोत्रातील

(VI) आम्ही कशाचा ललकार करणार आहोत ?

(अ) भक्तिचा (ब) युद्धाचा

(क) उत्क्रांतीचा (ड) नियतीचा

## SECTION-B

13. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही **तीन**) **3 × 1 = 3**

(I) डॉ. माशेलकरांचे माध्यमिक शिक्षण कोणत्या शाळेत झाले ?

(II) सुश्रुतला कोणाशी मैत्री करावयास आवडत होते ?

(III) मराठी दिन कोणत्या दिवशी साजरा केला जातो ?

(IV) अब्दुल तपोवनामध्ये कशासाठी जात असे ?

(V) कविवर्य नारायण सुर्वे यांच्यावर शालींचा वर्षाव का झाला होता ?

14. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा. (कोणतेही **तीन**) **3 × 1 = 3**

(I) थोरांची चरित्रे सामान्यांना ________ देतात.

(II) छे, छे, वजनाचा मार्ग भलताच ________ जातो.

(III) श्री नारायण सुर्वे यांच्यामते शालीमुळे शालीनता ________

(IV) डॉ. माशेलकरांना आयुष्याचे फार मोठे तत्त्वज्ञान ________ सरांच्या शिकवणुकीतून गवसले.

(V) तपोवनामध्ये अब्दुलचा सत्कार ________ यांनी केला.

15. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही **एक**) **1 × 3 = 3**

(I) पंताचे वजन कमी होण्यासाठी त्यांच्या पत्नीने त्यांच्या आहारमध्ये कोणता बदल केला ?

(II) लेखकाने भिक्षेक–याला दिलेल्या शालीचा उपयोग त्याने का व कसा केला ?

(III) पाठाआधारे ‘कथा’ या वाङ्मय प्रकाराची वैशिष्ट्ये लिहा.

16. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. (कोणतेही **तीन**) **3 × 1 = 3**

(I) संत नामदेवांनी देवाशी स्वतःचे कोणते नाते सांगितले आहे ?

(II) कवी नारायण सुर्वे यांनी ‘शाळा’ कशास म्हटले आहे ?

(III) कवयित्री सैनिकाचे औक्षण कशाने करते ?

(IV) कवी किशोर पाठक यांनी देशाच्या कोणत्या गोष्टीवर अधिकार सांगितला आहे ?

(V) कवी नारायण सुर्वेयांना आपली जिंदगी कशामध्ये बरबाद झाली असे वाटते ?

17. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा. (कोणतेही **तीन**) **3 × 1 = 3**

(I) झोनभट्टीत शेकावे पोलाद तसे ________ छान शेकले गेले

(II) वणवा लागतसे वनीं । पाडस चिंतीत________

(III) तुझी ________ दौड़, डोळे भरून पहावी

(IV) हजार आम्ही एकी बळकट, सर्वांचे हो एकच ________

(V) काय करावे वळेना, नाही ________ सामर्थ्य.

18. खालीलपैकी कोणत्याही एकाचे संदर्भासह स्पष्टीकरण करा. **1 × 3 = 3**

(I) अशा असंख्य ज्योतीची

तुझ्यामागून राखण

(II) हरघडी अश्रू वाळविले नाहीत; पण असेही क्षण आले

तेव्हा अश्रूच मित्र होऊन साहाय्यास धावून आले

19. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही **दोन**) **2 × 1 = 2**

(I) 'बार्क' म्हणजे काय ?

(II) व्युत्पत्तीकोशाचे कोणतेही एक कार्य लिहा.

(III) दुसऱ्या अनुभवातून डॉ. काकोडकर कोणता धडा शिकले ?

20. खालीलपैकी कोणत्याही एका विषयवार दिलेल्या मुद्यांच्या आधारे निबंध लिहा. **1 × 8 = 8**

(I) एका पूरग्रस्ताचे मनोगत

**मुद्दे** : गावातील नदीला महापूर – कारणे – गावाची स्थिती – सर्वत्र पाणी – दुःखाचा डोंगर – वीज, अन्ननाही – सर्वस्तरांवर मदत

(II) मला आवडलेले पुस्तक

**मुद्दे** : पुस्तकाचे नांव – लेखकाचे नांव – विषय – पुस्तक आवडण्याची कारणे

(III) पर्यावरणाबाबत विद्यार्थ्यांचे योगदान

**मुद्दे** : ग्लोबल वार्मिंग – कारणे – जंगल – वाचविण्याची गरज – शाळा, कॉलेज परिसरात वृक्षारोपण – जागृती – प्रदुषणाला आळा – स्वतः पासून सुरुवात

21. खालील मुद्यांच्या आधारे गोष्ट लिहा व गोष्टीला योग्य शीर्षक देऊन तात्पर्य लिहा. (कोणतेही **एक**)

**1 × 7 = 7**

**मुद्दे** : वृद्ध श्रीमंत शेतकरी – मुले आळशी – सर्व संपत्ती शेतात पुरली आहे, असे सांगतो – मुले शेत नांगरून शोधतात – संपत्ती मिळत नाही – नांगरलेल्या शेतात पेरणी – पीक बहरते

**अथवा**

**मुद्दे** : पाण्याबाहेर कासव येते – काठावर बेडूक आनंदाने उड्या मारत मजा करतो – आपल्या जड शरीराकडे पाहून कासव दुःखी–अचानक आकाशातून घार येऊन बेडकाला उचलून नेते–कासव स्वतःबद्दल दुःख करणे सोडून देतो.

22. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयवावर पत्र लिहा. **1 × 5 = 5**

तुमच्या शाळेजवळील बसच्या फेऱ्यांची वारंवारिता वाढविण्याची मागणी करणारे पत्र बस डेपोच्या आधिका–यास लिहा.

**अथवा**

तुम्ही राहात असलेल्या भागात दूषित पाणीपुरवठा होत असल्याची तक्रार करणारे पत्र नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागास लिहा.